Rayat Shikshan Sanstha's
Dahiwadi College Dahiwadi
Tal Man dist Satara
News Cliiping
Year 2020-21

# दहिवडी कॉलेजमध्ये वाचन प्रेरणादिन साजरा

**बिजवडी** / प्रतिनिधी

भारताचे दिवंगत राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची ८९ वी जयंती येथील दहिवडी कॉलेजमध्ये वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाचे आयोजन कॉलेजमधील ग्रंथालय, इंग्लिश, हिंदी, मराठी विभाग व माणदेशी साहित्य अध्यासन केंद्राच्यावतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बी. एस. बलवंत होते. यावेळी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. ए. एन. दडस, माणदेशी साहित्य अध्यासनाचे सचिव प्रो. डॉ. के. एम. पवार, कार्यालय अधिक्षक विलास मासाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. ए.पी. जे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला अभिवादन करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल व्ही.एस. वाघेरे यांनी केले. यावेळी डॉ. सुलोचना वाघमोडे यांनी वाचन संस्कृतीचे महत्त्व सांगून महापुरुषांच्या वाचन व्यासंगाविषयी भाष्य केले.

वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमाच्या निमित्ताने माणदेशी साहित्य अध्यासनाच्या वतीने प्र. प्राचार्य डॉ. बी. एस. बलवंत व इतर मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थी, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी यांना कोविड १९ विषयक नियमांचे पालन करून मोफत ग्रंथ वाटप करण्यात आले. आभार प्रदर्शन मराठी विभागप्रमुख प्रा. मिरा देठे यांनी केले.

# दहिवडी कॉलेजमध्ये प्रभाकर देशमुख यांचा सत्कार

**बिजवडी** / प्रतिनिधी

दहिवडी ता. माण येथील रयत शिक्षण संस्थेच्या दहिवडी कॉलेजमध्ये रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य प्रभाकर देशमुख यांचा सत्कार व कॉलेज परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला.



**दहिवडी येथील कॉलेज आवारात वृक्षारोपण करताना प्रभाकर देशमुख व इतर.**

दहिवडी कॉलेज या शाळेतील गुणवत्ता सुधार व शैक्षणिक पायाभूत सुविधांचा विकास कार्याच्या आढावा बैठकीसाठी प्रभाकर देशमुख आले होते. या वर्षी रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्यांच्या झालेल्या निवडीमध्ये प्रभाकर देशमुख यांची निवड झाल्याबद्दल कॉलेजच्यावतीने प्र. प्राचार्य डॉ. बी. एस. बलवंत यांच्या हस्ते सत्कार करून वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला.

रयत शिक्षण संस्था स्थापना शताब्दी वर्षापासून रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांनी शिक्षण घेतलेल्या दहिवडीस्थित जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्र. १ येथे गुणवत्ता सुधार व शैक्षणिक पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष प्रयत्नशील असल्याचे देशमुख यांनी सांगितले. या प्रसंगी दहिवडी नगरपंचायतीचे नगरसेवक अजित पवार, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर पुरुषोत्तम जाधव, सागर जाधव, बाळासाहेब सावंत, महात्मा गांधी विद्यालय व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य बी. एस. खाडे, राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख प्रा. के. एस. शिंदे, किमान कौशल्य विभाग प्रमुख बाजीराव नरळे, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. व्ही. व्ही. कांबळे व जि. प. शाळा क्र. १ येथील शिक्षक यांची उपस्थिती होती.

# माणदेश भागातील अभ्यासकांना अध्यासन फायदेशीर ठरेल : प्राचार्य आर. डी. गायकवाड

**बिजवडी / प्रतिनिधी**

ग. दि.माडगुळकर, व्यंकटेश माडगुळकर, उत्तम बंडू तुपे, डॉ. कृष्णा इंगोले, डॉ. शंकरराव खरात यांनी माणदेशाचे चित्रण आपल्या साहित्यातून सुंदररित्या केले आहे. त्यांच्या साहित्याच्या माध्यामातून माणदेश साता समुद्रापार गेला. माणदेशातल्या लोकांचे वेगळेपण त्यांच्या साहित्यातून डोकावत असते. ते वेगळेपण अभ्यासातून जगासमोर यावे, यासाठी दहिवडी कॉलेजमधील मराठी, हिंदी आणि इंग्रजी या भाषा विभागामार्फत अध्यासन सुरू केले आहे. या अध्यासनाच्या माध्यमातून माणदेश भागातील साहित्यिकांचे साहित्य एकाच छताखाली उपलब्ध होते. ही आनंदाची बाब आहे. माणदेश भागातील साहित्याचा अभ्यास करणाऱ्यांना या अध्यासनाचा निश्चितच फायदा होईल, असे मत प्राचार्य आर. डी. गायकवाड यांनी व्यक्त केले.



दहिवडी येथील कॉलेजमध्ये माणदेशी साहित्य अध्यासनाच्या उद्घाटन प्रसंगी रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव, मॅनेजिंग कौन्सील सदस्य आर. डी. गायकवाड, प्राचार्य डॉ. बी. एस. बलवंत व इतर.

रयत शिक्षण संस्थेचे दहिवडी कॉलेज, दहिवडी ता. माण येथे माणदेशी साहित्य अध्यासनाचे उद्घाटन रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव, मॅनेजिंग कौन्सील सदस्य आर. डी. गायकवाड यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. बी. एस. बलवंत होते. प्रा. गायकवाड पुढे म्हणाले, माणदेशी साहित्य अध्यासनाचे उद्घाटन एका माणदेशी साहित्यिकाकडून होते, ही आनंदाची गोष्ट आहे. दहिवडी कॉलेज हे माणदेशाची ओळख आहे. महाविद्यालयात शिक्षणासोबत माणदेशी साहित्याची ओळख व्हावी, अभ्यास व्हावा, समीक्षा व्हावी आणि हे साहित्य वाचून नव-नवे साहित्यिक निर्माण होण्याची प्रेरणा मिळावी. \ प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख प्रा. के. एस. शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन सौ. उज्वला मदने व सौ. मीरा देठे यांनी आणि आभारप्रदर्शन महाविद्यालयातील गुणवत्ता सुधार कक्षाचे समन्वयक आणि इंग्रजी विभाग प्रमुख डॉ अनिल दडस यांनी केले. यावेळी डॉ एस. बी. वाघमोडे, प्रा. जमदाडे, प्रा. मोरे, प्रा. अनंत तडके, प्रा. सौ. बलवंत, प्रा. जठार, सतीश कांबळे, अंकुश शेलार, हणमंत खाडे, नितीन जगताप आदी शिक्षक शिक्षकेतर सहकारी उपस्थित होते.

सकाळ

# दहिवडी कॉलेजच्या इमारतींचे भूमिपूजन

**गोंदवले, ता. २७ :** भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विकास मंत्रालयाद्वारे दहिवडी कॉलेज दहिवडीमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील उपजीविका व्यवसाय विकास केंद्र व क्रीडा विभागासाठी नव्याने उभारण्यात येणाऱ्या इमारतींच्या बांधकामाचे भूमिपूजन कार्यक्रम रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य डॉ. प्रदीपकुमार शिंदे, सुनील पोळ, प्राचार्य डॉ. बी. एस. बलवंत, प्राचार्य बी. एस. खाडे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी दादासाहेब चोपडे, डॉ. एम. जे. लुबाळ, प्रा. के. एस. शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

नव्याने उभारण्यात येणाऱ्या या इमारतींमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील उपजीविका व्यवसाय विकास केंद्रांतर्गत महाविद्यालयात सुरू असलेल्या गांडुळ आणि गांडुळ खतनिर्मिती, मधमाशी पालन व मधप्रक्रिया, रेशीम उद्योग, आधुनिक रोपवाटिका तंत्र, तुषार प्रणाली आणि ठिबक सिंचन, कृषी उत्पादन विपणन या सहा प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या एकूण ३५० प्रशिक्षणार्थी उद्योजकांना मार्गदर्शन, दिग्दर्शन व प्रात्यक्षिक कार्यासाठीच्या अद्ययावत पायाभूत सुविधा उपब्ध करून देण्यात येणार आहेत. भारत सरकारच्या अनुदानातून या इमारतींची उभारणी परशुराम महादेव शिंदे कन्याशाळेजवळ दहिवडी कॉलेजच्या जागेत होणार आहे. क्रीडा विभागाचा जिमखाना व जिमखाना साहित्य ठेवण्यासाठी स्वतंत्र इमारत उभारण्यात येणार असून, त्यात अद्ययावत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यावेळी रयत शिक्षण संस्थेचे आजीव सभासद पुरुषोत्तम जाधव, पर्यवेक्षक टी. एस. माने, प्रा. दत्तात्रय मांजरे, डॉ. सुहास कांबळे, डॉ. शिवशंकर लेकुरवाळे यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



**दहिवडी : कर्मवीर भाऊराव पाटील उपजीविका व्यवसाय विकास केंद्र व क्रीडा विभागासाठी नव्याने उभारण्यात येणाऱ्या इमारतींचे भूमिपूजनप्रसंगी डॉ. प्रदीपकुमार शिंदे, प्राचार्य डॉ. बी. एस. बलवंत, सुनील पोळ व मान्यवर.**

Satara, Satara-Today
28/10/2020 Page No. 2